### राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम आव्हान
# चान्सलर्स ब्रिगेड आजपासून कृषि विद्यापीठात आयोजन!

- राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी गिरविणार आपत्कालीन व्यवस्थापनाचे धडे!
- डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाला मिळाला राज्यस्तरीय आयोजनाचा बहुमान!

■अकोला,दि.१६ (प्रतिनिधी)■
महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठातील (कृषी व अकृषी) विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच कौशल्य व नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी तसेच अचानक घडणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवनिर्मित घटनांमुळे होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान व सामाजिक अव्यवस्था टाळण्यासाठी माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशांनुसार 'आव्हान- चान्सलर्स ब्रिगेड' या महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये करण्यात येऊन विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीत पूर्वतयारी,शिस्त, समन्वय आणि तत्पर सेवाभाव वृद्धिंगत करण्यात येते. अश्या या अतिशय महत्त्वाकांक्षी राज्यस्तरीय शिबिराचे आयोजनाची जबाबदारी यंदा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचेकडे आली असून दिनांक १७ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अकोला येथील मुख्यालयी आयोजित 'महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे'



उद्घाटन शनिवार दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ठीक दहा वाजता कृषी महाविद्यालय परिसरातील दीक्षांत सभागृहात संपन्न होणार आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत संपन्न होणाऱ्या या भव्य दिव्य उदघाटन सोहळ्याचे उदघाटन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांची शुभहस्ते संपन्न होणार असून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, एन डी आर एफच्या नागपूर येथील अकॅडमीचे संचालक ब्रिगेडियर आर सत्यनारायणन, पुणे येथील कमांडंट ५ बटालियनचे ब्रिगेडीअर संतोष बहादूर सिंग यांचे सह विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या प्रसंगी विद्यापीठाचे सर्व सन्माननीय संचालक, अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता, कुलसचिव, राज्यातील सर्व विद्यापीठांचे संचालक विद्यार्थी कल्याण, कार्यक्रम समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना यांची उपस्थिती राहणार आहे. तर सभागृहात संपूर्ण राज्यातून आलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित राहणार आहेत.

## प्रतिबंधात्मक आदेश लागू; मोर्चे, आंदोलनाला मनाई !

**अकोला :** आगामी सण व निवडणूक कालावधी लक्षात घेता जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ च्या च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश २३ जानेवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील. या कालावधीत मोर्चे, आंदोलने काढण्यास, तसेच पाच किंवा पाचहून जास्त इसमांना एकत्रित येण्यास मनाई आहे. स्फोटके, दाहक पदार्थ वाहून नेण्यास किंवा शस्त्रे बाळगण्यास मनाई आहे. समाजात तेढ निर्माण करणारे कोणतेही कृत्य करण्यासही मनाई करण्यातआली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

## ट्रकचा धक्का लागल्यामुळे एकाचा मृत्यू, गुन्हा दाखल

**बाळापूर :** बाळापूर - सातरगाव रोडवर असलेल्या वीट भट्टीवर ट्रकची साफसफाई करीत असताना अचानक एकाचा धक्का लागल्यामुळे ३७ वर्षीय मजुराचा मृत्यू होण्याची दुर्दैवी घटना १३ डिसेंबर २०२५ रोजी घडली होती. सदर प्रकरणी दाखल फिर्यादनुसार बाळापूर पोलिसांनी १४ जानेवारी रोजी ट्रक चालकाविरूध्द कलम २८१, १०६ भारतीय न्याय संहीते अन्वये गुन्हा नोंदविला.

# जागेच्या वादातून चुलत भावाची धिंडवणारी मारहाण

### सिरसो गावात रात्रीचा थरार; काठ्या-थापडांचा हल्ला, गुन्हा दाखल

■अकोला,दि.१६ (प्रतिनिधी)■
जल्ह्यातील मुर्तिजापूर तालुक्यातील ग्राम सिरसो येथे जागेच्या वादातून हिंसक प्रकार घडल्याने गावात खळबळ उडाली आहे. दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी अमोल कीसन अंबाडे यांचे चुलत भाऊ प्रकाश अंबाडे यांच्या घराजवळ वाद निर्माण झाला. घराशेजारी ठेवलेल्या सेंट्रींग साहित्यावरून सुरू झालेला वाद अचानक उग्र बनला. आरोपी विशाल, प्रदीप, मनोहर गोरले व पुर्वेष दळवी यांनी शिवीगाळ करत घरातून लाकडी काठ्या आणून प्रकाश अंबाडे व त्यांच्या पत्नीवर हल्ला चढवला. लोट-लाट, थापड-बुक्यांनी बेदम मारहाण करत पुन्हा जागेचा विषय काढल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देण्यात आली. फिर्यादीच्या जबाबावरून मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस



ठाण्यात अप नं. १६/२६ अन्वये कलम ११८(१), ३५१(२), ३५२, ३(५) बि.एन.एस. २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा तपास ठाणेदार श्रीधर गुठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली कउ मनीष मालठाणे करीत असून पुढील कारवाई सुरू आहे.

## कुणबी समाज विकास मंडळ,अकोलाचा ऋणानूबंध परिचय पुस्तिका प्रकाशन सोहळा

### डॉ.बाबुराव शेळके यांचे कुणबी समाजाला आवाहन

■अकोला,दि.१६ (प्रतिनिधी)■
कुणबी समाज विकास मंडळ अकोला या मंडळाचा नेहमीच समाज ऊपयोगी कार्यक्रम तसेच सामाजिक बांधीलकी जोपासत ईतरही समाजीक कार्यक्रमात अग्रेसर असनारी संघटना म्हनून कुनबी विकास मंडळ अकोला जिल्ह्यात कार्यरत आहे यावर्षी सूद्धा समाजातील यूवक युवतीचे लग्ण जुळावे त्यासाठी कूनबी विकास मंडळ अकोला जिल्हाचे वतीने समाजातील ऊपवर वधुवराचा बायोडाटा जमा करुन युवक,यूवती परीचय पुस्तीकेचे ऋनानूबंध पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासाठी छापुन तयार केले आहे या यूवक यूवती 'ऋणानुबंध '-२०२६चा प्रकाशन सोहळा तसेच समाजातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी चा तसेच गुणवंताचा सत्कार समारंभ रविवार दि. १८जानेवारी २०२६रोजी सकाळी ११वाजता स्व. किसनराव सोनोने मंगल कार्यालय, गोरक्षण रोड अकोला येथे समाजातील जेष्ठ मान्यवरांचे उपस्तितीत संपन्न होत आहे.

तरी या कार्यक्रमाला समाज बांधवानी मोठया संख्येने उपस्तित राहावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ बाबुराव शेळके, कार्याध्यक्ष संजय बागलकर, सचिव श्रीकांत ढगेकर, कोषध्यक्ष किशोर ठाकरे यांनी केले आहे.

## रोटरी क्लब ऑफ अकोट च्या वतीने युथ मंथ साजरा

■अकोट,दि.१६ (प्रतिनिधी)■
शहरातील लाल बहादुर शास्त्री ज्ञानपीठ व ज्युनिअर महाविद्यालय मध्ये विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा हा उद्देश ठेवत ज्ञानसागर या स्नेह संमेलना निमित्त साधुन रोटरी क्लब ऑफ अकोट च्या वतीने 'युथ मंथ' साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विविध स्पर्धा आयोजित करत त्यामध्ये प्रामुख्याने रांगोळी स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,निबंध स्पर्धा,एकल स्पर्धा यांमध्ये विद्यार्थ्यांनी उस्फुर्त पणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणुन विवेकवर्धीनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री.नानासाहेब हिंगणकर,सचिव श्री.भरत पेठे,व्यवस्थापक श्री.रमेश टावरी,माजी अध्यक्ष श्री.सुरेशदादा खोटरे,कोषाध्यक्ष श्री.कुंजीलाल कोठारी,रोटरी क्लब ऑफ अकोट चे अध्यक्ष इंजि.रवि पवार यांची प्रामुख्याने उपस्थित होते.विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रथम,व्दितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षिस व सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देत त्यांचा गौरव करण्यात आला.सदर युथ मंथ प्रकल्पाचे प्रमुख श्यामकुमार शर्मा होते.यावेळी रोटरी क्लब



ऑफ अकोट चे अध्यक्ष इंजि.रवि पवार,सचिव डॉ.नवेश मोहता, राजकुमार गांधी,संतोष इस्तापे,शिरीष पोटे,इंजि.प्रमोद लहाने,उद्धवराव गणगणे,दिपक कतोरे व रोटरी क्लब ऑफ अकोट चे सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन विशाल सर,सपना मॅडम,प्राजक्ता मॅडम यांनी केले. साउंड व्यवस्था आकाश गोरले,रवि टिकार,हरिओम भगत यांनी पाहिली.

## पळसो बढे येथे आजपासून भागवत सप्ताह, ज्ञानयज्ञ

**अकोला :** रामगोपाल महाराज यांच्या पदस्पशाने पावन झालेल्या पळसो (बढे) येथे अखंड हरीनाम सप्ताह भागवत ज्ञानयज्ञ सोहळा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन १७ ते २४ जानेवारीदरम्यान करण्यात आले आहे. सप्ताहात दररोज पहाटे काकडा आरती विष्णू सहस्त्रनाम आणि सकाळी ८ ते ११.३० ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ नेतृत्व हभप गुरुवर्य मनोहर महाराज सुभेकार श्री क्षेत्र आळंदी, दुपारी २ ते ५ श्रीमद भागवत कथा प्रवक्ते हभप योगेश महाराज हिवाळे श्री क्षेत्र शेगाव, सायंकाळी ६ ते ७हरीपाठ, रात्री ८ ते १० हरीकीर्तन, १७ जानेला हभप योगेश महाराज हिवाळे श्री क्षेत्र शेगाव, १८ ला श्री हभप पोपट महाराज फरकाडे, १९ ला हभप श्री अक्षय महाराज बोर्डे पळसो (बढे), २० ला हभप मयुर महाराज हरणे श्री क्षेत्र जि. वर्धा, २१ ला हभप शिवराज महाराज पवार (बुलडाणा), २२ ला संभाजी महाराज मेहुणकर (दिंडोरी), २३ ला हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ (ज्ञानेश आश्रम वारी भैरवगड), २४ जानेवारीला हभप कोमल महाराज पाटील (खेड भाकेटीकर) यांचे काल्याचे कीर्तन सप्ताहातील गंधर्व सभा गायनाचार्य हभप विष्णुमहाराज ढगे आळंदीकर, सप्ताहातील गंधर्व सभा गायनाचार्य हभप विष्णु महाराज ढगे (आळंदीकर), गायनाचार्य हभप सोपान महाराज लोखंडे (शिरसोलीकर), गायनाचार्य हभप योगेश महाराज मुदंगाचार्य हभप कपील महाराज शेळके (आळंदीकर), मृदंगाचार्य हभप वैभव महाराज चवरे सेवा देणार आहेत.

## अनाथ वृद्धाचा ग्रामस्थांनी पार पाडला अंत्यविधी

**अकोट :** ज्या वृध्दाचा या जगात कोणीही वारसदार वा नातेवाईक नाही, अशा अनाथ वृध्दाचा मृत्यू झाल्यानंतर तालुक्यातील सावरगाववासीयांनी अंत्यविधी पार पाडला.सावरगाव गावात वासुदेवराव शेगोकार हे वास्तव्यास होते. त्यांना कोणताही नातेवाईक वा वारसदार नव्हता. शरीर साथ देईपर्यंत त्यांनी मजुरीचे कामकाज करून आपले पोट भरले. मात्र वृध्दत्व आल्यामुळे त्यांच्याने काम होत नव्हते. परंतु गावकऱ्यांनी माणुसकी जपत त्यांना अखेरपर्यंत साथ दिली. त्यांची प्राणज्योत मावळल्यानंतर गावकरी विठ्ठलराव नारे, शुभम नारे, राममूर्ती नारे, संजय वाघ, सुरेश नारे, शिवदर्शन नारे, वासुदेव बैतुले, माणिक नारे, सेवकराम धुमाळे यांच्यासह शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## योगासन स्पर्धेसाठी अनिल काळे यांची राज्यस्तरावर निवड

■अकोट,दि.१६ (प्रतिनिधी)■ तेल्हारा पं.स. अंतर्गत येणाऱ्या चिपी गायरान येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षक अनिल काळे यांची शिक्षक व अधिकारी कर्मचारी स्पर्धा २०२५-२६ करिता वैयक्तिक योगासन प्रकारांमध्ये राज्यस्तराकरिता निवड झाली आहे. २० डिसेंबर रोजी अमरावती येथे विभागस्तरीय स्पर्धा पार पडल्या. यामध्ये ४६ ते ५८ या वयोगटात अनिल काळे यांनी पाचवे स्थान प्राप्त केले आणि ते राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. येत्या १७ जानेवारी रोजी राज्यस्तरीय योगासन स्पर्धा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड येथे पार पडणार आहेत. यामध्ये राज्यभरातून १६० स्पर्धक सहभागी होणार आहेत. राज्यस्तरावर निवड झाल्याबद्दल काळे यांचा तेल्हारा पं. स. मध्ये गटविकास अधिकारी बांगर यांनी सत्कार केला. यावेळी गटशिक्षणाधिकारी बकाल, विस्तार अधिकारी रविंद्र चौथमल, विस्तार अधिकारी परवेझ, तालुका क्रीडा समन्वयक राजेश चित्ते तसेच मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. अकोट तालुक्यातील मूळचे सावरा येथील रहिवासी अनिल काळे यांना बालपणापासूनच योग प्राणायामाची आवड आहे. महात्मा गांधी योग व निसर्गोपचार संस्था दिल्लीचे ते निसर्गोपचार तज्ज्ञ सुध्दा आहेत. ते मागील १७ वर्षापासून विविध सामाजिक संस्थांचे माध्यमातून योग प्रशिक्षण वर्ग घेतात.

## एलआरटी वाणिज्य महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**अकोला :** स्थानिक एलआरटी वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाने यांच्या मार्गदर्शनात तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. एन. एम गुट्टे, डॉ. मोनिका साबू यांच्या नेतृत्वात रासेवो पथकाद्वारे युवकांचे प्रेरणास्थान असणारे स्वामी विवेकानंद यांची १९६३ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गोंडाने यांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनिका साथ यांनी स्वामी विवेकानंद यांच्या महान कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले. डॉ. एम एन गुट्टे यांनीही विद्याथ्यांना स्वामी विवेकानंद आमच्या जीवन चरित्राबद्दल सविस्तर माहिती दिली.

## संस्कृती फाऊंडेशनच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

बाळापूर : तालुक्यातील वाडेगाव येथील संस्कृती फाऊंडेशनचे वतीने गतवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवक दिनानिमित्त वाडेगाव येथील शिवपूरी संस्थान येथे पार पडलेल्या रक्तदान शिबिरामध्ये युवक वर्ग तसेच नागरिकांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. प्रारंभी राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येवून उपस्थितांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. आयोजित रक्तदान शिबिरात आपला नोंदविलेल्या रक्तदाते यांना संस्कृती फाऊंडेशनचे वतीने स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित पुस्तक व फळ वृक्ष स्नेह भेट दिले. आयोजित रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी संस्कृती फाऊंडेशनचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.आमदार किरण सरनाईक यांची बालाजी इंग्लिश स्कूलला भेटवाडेगाव येथील श्री बालाजी इंग्लिश वाडेगाव येथे शिक्षक आमदार किरण सरनाईक यांनी सदिच्छा भेट दिली, शिक्षकांना मार्गदशन करताना त्यानी सांगितले की आपला हक्क बजावण्या करिता आपण जागृत असणे आवश्यक आहे.

# गाडगेबाबा कर्मभुमी महोत्सवाचे ऋणमोचनमध्ये आयोजन

### सत्यपाल महाराजांची खंजेंरीचा आवाज १८ जानेवारीला निनादनार

■अकोला,दि.१६ (प्रतिनिधी)■
थोर समाज सूधारक जगाला स्वच्छतेचा मंत्र देनारे व आपल्या हातातील खराट्याने व भोळ्या बापड्या जनतेच्या डोक्यातुन अंधश्रद्धेचा नाष करनारे संत गाडगे बाबा यांचा जन्म सातपुड्याचे पायथ्याशी अमरावती जील्ह्यातील शेंडगाव २३ फेब्रूवारी१८७६ ला झाला तर बाबानी घरादाराचा त्याग करून बरबटलेल्या समाजात अंध निराधाराना मदत रोग्याना औषध अन्न निवारा शिक्षण लग्ण स्वच्छतेचा मूख्य मूलमंत्र देत देव दगडात नसून देव रोगी निराश्रीताच्या सेवेत देव सामावला असून मनसालाच बारा बुरुज असून त्या खऱ्या परमात्माने मनवरुपी देहात आत्मारुपी ज्योत तेवत ठेवली असून ती ज्योत म्हनजे परमात्माच्या अंश आहे त्याला तुम्ही दारु मटन कोबंड बकर! खावू घालता असे गावोगावी गाव स्वच्छ करुन कर्दीलरुपी ऊजेडात लोकाशी संवाद साधून दगडाचे टाळ करून सांगत त्यानी अमरावती जील्ह्यातीलच आमला या गावी पुर्णेवर घाट बांधला तीथे महादेवाचे मंदीर असून तीथे पौष महीन्यात पुर्ण विदर्भातील रोगी अंध अपगाची सोय व्हावी त्याना भरपेट जेवन मिळावे म्हनुन शेवटच्या पौष महीन्यातल्या रवीवारी यात्रा नियोजन केले त्या वेळेस तीथे मूबई पुना अकोला अमरावती येतील दानशूर लोकाना बाबा आव्हाहन करून मदत करन्याचे व सेवेचे दान मागुन घोगंडे कपडे लत्ते भडांरा रूपी अन्नदान वाटन्याची प्रथा पाडुन गेले ..असे तेथील ट्रस्टीचे माध्यमातुन समजते, आजही तेथे ही परंपरा चालू असून दक्षीण पैलतीरी मठ मंदिर आहे शासनाच्या विवीध योजने मधुन आमला ग्रामामधे पुर्णा तिरावर सामाजीक सभागृह निवास व्यवस्था मंदीर असे असून या ऋणमोचन यात्रा ही विदर्भातील मोठी यात्रा म्हनून प्रसिद्ध आहे.

अकोला जिल्ह्यातीलच नव्हेतर अमरावती सह ऊभ्या महाराष्टातील धोबी समाजाकडुन ,ऊत्तरे कडील पैल तिरी महादेव मदिर बाजुने यात्रे मधे धोबी समाज बांधवाना एकत्रित करुन बाबाच्या दशसूत्रीचा जागर गेल्या कीत्येक वर्षापासून खंजेरीवादक सत्यपाल महाराजाकडून आयोजक श्री संत गाडगेबाबा कर्मभुमी स्मारक समीती क्षेत्र ऋणमोचन जिल्हा अमरावती कडून हजारो लोक लाभ घेतात यावर्षी सूद्धा दिंनाक १८//२६ ला अंदाज पत्रक समीती प्रमूख आमदार रविभाऊ राणा, माजी खासदार नवनीत राणा, सामाजिक कार्यकर्ते सूनीलभाऊ राणा यांचे प्रमूख ऊपस्थितीत साजरा होत असून सकाळी ध्वजारोहण पुजन आणि महाराष्ट्रभुषण विदर्भाचे सूपुत्र सप्त खजेरी वादक सत्यपाल महाराजाच्या निसवार्थपणे रोख ठोक वाणीने राष्ट्रसंताच्या विचाराचा व गाडगेबाबाचा दशसूत्री जागराचा कार्यक्रम होनार आहे त्या नंतर महाप्रसादाचे सूद्दा आयोजन स्मारक समीती कडुन केले आहे तर या यात्रेत पुर्ण भारतभरातील बहुभाषीकासह धोबी वरठी परीट परदेशी रजक समाज बांधव हजेरी लावावी व बाबाच्या खराटा हा नूसता स्वच्छतेचाच नसून समाज सूधारक म्हनून मेंदुतील अधश्रद्धा रुपी घाणीचा नाश करनारे व ग्रामगीतेतुन गावकुसाचा शिक्षणावर भर देनारा व्यर्थ ची लग्नात खर्चाला आडा बसावा गोरगरीबाना शिक्षनाला मदतीचा हात देन्याचे प्राणी मात्रावर दया दाखवन्याचे अशा माध्यमातुन दशसूत्रीचा जागर सप्त


## महाराष्ट्र शासन
### अल्पमुदत ई-निविदा सुचना क्रमांक-21/ 2025-26 व 23/2025-26
**उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग, अकोट यांचे कार्यालय. दु.ध्व.क्र.(07258) 203711ई-मेल -dcf.akot@yahoo.com ;dycfwlakot@mahaforest.gov.in**

### प्रेस नोट

शहानुर संकुल, शहानुर, ता.आकोट, जि.अकोला आणि वसाली इको सायंन्स पार्क, वसाली, ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा येथे उपहारगृह चालविण्याकरिता सेवा पुरविण्याबाबत विहित प्रपत्रात संबंधीत तालुक्यातील स्थानिक/जंगला लगतचे योग्य त्या पात्र नोंदणीकृत स्वयं सहाय्यता गट (S.H.G.) यांचेकडून ऑनलाईन ई- निविदा मागविण्यात येत आहेत. ई- निविदा जाहिरात www.mahatenders.gov.in व www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| ई- निविदा सुचना क्र. | कामाचे नांव | निविदा प्रपत्राची किंमत | बयाणा रक्कम (1%) | कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 22 | नरनाळा परिक्षेत्रातील शहानुर संकुल, शहानुर, ता.आकोट, जि.अकोला येथे उपहारगृह चालविणे सेवा पुरविण्याबाबत. | 1000 | 10000 | 11 महिन्याकरिता | संबंधीत तालुक्यातील स्थानिक/जंगला लगतचे नोंदणीकृत स्वयं सहाय्यता गट (S.H.G.) | वनपरिक्षेत्र (वन्यजीव)अधिकारी, नरनाळा भ्र.क्र.-9075755224 |
| 23 | सोनाळा परिक्षेत्रातील वसाली इको सायंन्स पार्क, वसाली, ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा येथे उपहारगृह चालविणे सेवा पुरविण्याबाबत. | 1000 | 10000 | | | वनपरिक्षेत्र (वन्यजीव)अधिकारी, सोनाळा भ्र.क्र.-9823239692 |

ईच्छुक नोंदणीकृत नोंदणीकृत स्वयं सहाय्यता गट (S.H.G.) यांनी विस्तृत माहिती करीता शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**ई-निविदा-वेळापत्रक:-**
1) ऑनलाईन निविदा विक्री करणे व स्विकृती दिनांक 16/01/2026 सकाळी 10.00 वा. ते दि.20/01/2026 रोजी सायं.17.00 वाजेपर्यत.
2) ऑनलाईन तांत्रिक निविदा उघडणे दि.21/01/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता. (शक्य झाल्यास).

वि.मा.का./अम./जाहि/९२८/२०२५-२०२६

राहुल सिंह टोलिया (भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
आकोट वन्यजीव विभाग, आकोट.



RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak, Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, त्मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

